फोन नं.  : २३०२३९००

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ. आनंदराव नायर मार्ग,मुंबई सेंट्रल,मुंबई--४०० ००८

## रा.प.महामंडळातील शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमध्ये सुधारित मार्गदर्शक तत्वे विहीत करण्याकरिता सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जाच्या दोन अधिका-यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज मागविणेबाबत.

म.रा.मा.प.महामंडळातील सध्या अस्तित्वात असलेल्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमध्ये सुधारीत मार्गदर्शक तत्वे विहित करण्याच्या कामकाजाकरिता निव्वळ करार पध्दतीने मासिक ठोक मोबदल्यावर दोन महिन्यांच्या कालावधीकरिता रा.प.महामंडळामध्ये सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांची नेमणूक करण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**(अ) शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

१. **सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जा अधिकारी -- पदसंख्या १**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कला,वाणिज्य किंवा विज्ञान पदवीसह मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची समाजकार्य व्यवस्थापन (एम.एस.डब्ल्यू / एम.एल.डब्ल्यू), कामगार विज्ञान (एम.एल.एस) यामधील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे.

ब) (१) एखाद्या ७५,००० हून कमी कर्मचारी संख्या नसलेल्या औद्योगिक संस्थेतील / शासकीय, निमशासकीय सेवेतील अधिकारी वर्ग-१ दर्जाच्या पदावर काम केल्याचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. रा.प.महामंडळातील वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येऊन अनुभवाचा कालावधी किमान १ वर्षा इतका कमी करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांस राहतील.

(२) कामगारांचे प्रश्न,त्यांची गा-हाणी हाताळण्याचे तसेच नागरी सेवा (शिस्त व अपिल कार्यपध्दती) या बाबतचे सखोल ज्ञान असणे आवश्यक असेल.

२. **सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जा अधिकारी -- पदसंख्या १**

अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कायदे विषयक पदवी असणे आवश्यक आहे.

ब) एखाद्या ७५,००० हून कमी कर्मचारी संख्या नसलेल्या औद्योगिक संस्थेतील/ शासकीय , निमशासकीय सेवेतील कायदेविषयक कामकाज हाताळण्याचा वर्ग-१ दर्जाच्या पदाचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. रा.प.महामंडळातील वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांना प्राधान्य देऊन जरुर तर अनुभवाचा कालावधी किमान ६ महिने इतका कमी करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांस राहतील.

उपरोक्त अर्हता व अनुभव शिथील करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांस राहतील.

**(ब)** मासिक परिश्रमिक भत्ते व इतर अटी व शर्ती शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार राहतील. त्यामध्ये बदल व रदद करण्याचे संपूर्ण अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांस राहतील.

**(क)** नेमणूकीचा कालावधी - सदर नेमणूक ही दोन महिन्यांच्या कालावधीकरिता राहील. आवश्यक वाटल्यास अधिक एक महिन्याचा कालावधी वाढविण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

**(ड)** अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख - दि.०८ डिसेंबर,२०१७

**(इ)** पत्र व्यवहारासाठी पत्ता - अर्ज लिफाफ्यात बंद करुन लिफाफ्यावर **सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जाच्या दोन अधिका-यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज** असे नमुद करुन खालील पत्त्यावर पाठविण्यात यावा.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं),
म.रा.मा.प.महामंडळ,कर्मचारीवर्ग खाते, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.